॥ खंड ०१/०२ ॥

॥ माया-चैत्यन्या आदीमाया-शक्तीची ओवी नं. ०३ ॥

॥ निरसनसह सावंगा-जळगाव दांडची मुळावरची ओवी ॥

॥ गायत्री गायची ओवी ॥

॥ माया चैत्यन्या आदीमाया ॥

या ओवीची पलट ओवी खंड०७/ओवी-०९ मध्ये दिलेली आहे.

॥ माया चैत्यन्या, आदी माया । विनवितो इथं ।
हे होय माया । माहया मायची, सांगतो किर्त ॥ घृ ॥
॥ स्वर्गा वरं, होती गाय । तिचे होते चौघं ।
तिच्या अमृतानं देह । जगवला पिंडं ॥
॥ अमृत पान्हा, पाजुन चौघां । अशी बोले गायं ।
माझा अंगी कार आता । कोण करन साहयं/सोय ॥
॥ भाग वचनं, पुर्विच देणं । तुम्ही राखा ईमानं ।
भैस बोले, हद्‌यी मांसी । जागा देईनं ॥

किंवाः- ॥ भाग वचनं पुर्विचं देणं । तुम्ही राखा ईमानं ।
माझा अमृत पान्हा पेल्ले । तुम्ही चौघे जन ॥..जळगाव
॥ अमृत पान्हा पैल्ले त्या । चौघाशी बाले गाय ।
माहया पिड मौसाची । कोण करन सोय ? ॥..जळगाव
॥ तेव्हा भैस राज बोलला । तु का भेते मायं ?
तुया पिंड-मौसाची जागा । माहया हद्‌यात आहयं ॥...जळगाव
॥ गाळा मध्ये गाय फसली । निरोप चौघाशी ।
वरवर केलं तिघांनं । चिंता, पडली भैसाशी ॥ ..जळगाव

॥ चिखला मध्ये गाय फसली, । निरोप चौघांशी ।
वरवर केलं, तिघानं । चिंता, पडली भैसाशी ॥
॥ आदी रूप भैस याहीनं । उपसली गायं ।
गंगे तिरी नेवुन तिचे । धुतले पाय ॥

किंवा :-॥ आधे भैसानं बांधली कंवर । उपसली गाय ।
ही वर थडी गंगा वाहे । तिथं झोकले/धुतले पाय ॥..जळगाव

॥ गाय बोलली, भैसा परी । मी जातो पाहयं, मी राहते साहयं ।
त्याच वेळी त्या गाईनं । ठेवला पिंड ॥
॥ गाय मेली/गेली, ताळी आली । ऐसा बोले भैसं ।
ब्रम्हा विष्णु, तिरनयनं । चला जावु तिथं ॥०८॥
॥ चौघं मिळुन, ताळी येवुन । उध्दारली/विधारली गायं ।
चार वाटण्या, चार भाग । सुदामत आहयं ॥

किंवा :-॥ सर्वणाचा सुरा घेवुन गाय, विधारली याहीनं ।
चौघा जनांच्या चार वाटण्या । ठेवल्या करून ॥ ..जळगाव
॥ वेद आले, पोटी आपला । भाग घेतला भक्षुन ।
त्या तिघानं गंगेत जावुन । केलं पिंडदान ॥ ...जळगाव

॥ आपला भाग पहा गिळला । राया भैसानं
तिघां जनांन, गंगेत जावुन । केलं पिंड दानं ॥
॥ आदी रूप भैस राया । गंगे थडी होता ।
सोडलेले तिन पिंड । गिळले आता ॥
॥ भाग वचन पुर्विचं देणं । राखलं ईमानं, राखला मान ।
हद्‌यी मांसी, जागा देल्ली । आदी भैसानं ॥ १२ ॥
॥ तिघां जनां, पुसे खुणां । माया देवतां ।
गाई पोटी, सर्वच होतं । गमावलं आतां ॥

किंवा :-॥ माया देवता पुसे तिघा । काय केली गाय ।
गाई पासुन अवघंच होतं । गमावली सोय ॥ ..जळगाव

॥ होवुन मावची, कलारीन । वसवली पेठं ।
गळा हात, घालुन भैसालां । आणावं/आणले इथं ॥
किंवा :- ॥ होवुन मावची कलारीन । वसवली पेठं ।
हे होय माया कौशल्य । याची सांगतो किर्त ॥
॥ होवुन मावची कलारीन । लावली भट्टी ।
गळ्यात घाला हात भैसाला घेवुन या येथी ॥
॥ पाजुन महा कारण कारं । कळपी केला धुंदं ।
उलाट होवुन, त्या भैसालां । अवघी होती/आहे शुध्दं ॥
किंवा :- ॥ मधुपानाचे प्याले पाजले । कैपी केला धुंद ।
खाल्या पाडला भैस याहीला । होती सुदबुध ॥ ..जळगाव
खाल्या पाडला :- डोके धरून खाली वसण्यास भाग पाडणे
॥ वेदा पाठी, वेद पढले । सुने वेद तीनं ।
अथर्वन वेद, पोटी राहीला । यवगा/पुढंच कारणं ॥१६॥
॥ वेद घेवुन तिन देवं । खुशाल मनाशी ।
ज्या वेदानं, व्हाव जागी तो । नाही तिघा पाशी ।
अमृत संजीवनी आहे । भैसा च्या पाशी ॥१७॥
॥ तिन वेद हाती घेतले । काही नाही त्याला ।
तिन ताळाचा हिशोब याहीनं । आकार केला ॥
॥ कजब्या मध्ये, हिशोब केलां । याहीला केले हिनं ।
स्वर्ग-पाताळ, पेठा नांदते । अमृता गुणं ॥ १८ ॥
॥ स्वर्गि अमृत पाताळी अमृत, नाम नाही धन्या ।
नाम नाही रे धन्या । दोन्ही, पेठां पडल्या सुन्या ॥
॥ यवगा परी, भ्रांत सारी । आज होतो नेणंता ।
वजाबाकी, भरून झाली, यवगाची कथा ॥१९॥
॥ अन्न-पाण्याचे, आहार त्याहीला । हे जातीनं सकस ।
साहंकारी पोहना अधारी । तो नादंन इथं ॥ २० ॥
॥ चतुर्पता गिण्यानं देवाचं । चालन परमाण/प्रमाणं ।
राज्य येईन भैसाचं । याहीचं उडवनं ठिकाणं ॥२१॥
किंवा :- मिर्त लोकी, तिर गुणांचं । उडवणं ठिकाणं ॥
॥ चतुर्पता, अथर्वन् वेद । उभा राहीन पोटी । देव उभा राहीन येथी..
निजरूप भुम्मा, जागी करनं । सारी शिरष्टी/सृष्टी ॥२२॥
किंवा:- ॥ चतुर्पता अथर्वन् वेद । हे भैसा पोटा ।
निजरूप भुम्मा देहे जागी । करन सर्वत्रा ॥ ..जळगाव
भजने:- ॥ आथर्वन वेदाची गाही । जागी करन, देव सारी सृष्टी ॥
॥ आथर्वन वेदाची मांडणी । सांगी सांगे हो आकाश वाणी ॥
॥ माया देवता माय तिघाची । गुणावंती रूपावंती माय माझी ॥
॥ माया देवता माय तिघाची । चतुर्पता गाय, माय माझी ॥
॥ हे होय गाय गाय । हे होय गाय गाय ।
गाय मिर्तलोकी/स्वर्गावरती/तिरभवनी राहयें इला पाहयं ॥
॥ हे होय गाय गाय । हे होय गाय गाय ।
गाय चौवेदाची/सर्वत्राची माय । चातुरा भला भेद तु पाहयं ॥

गजर :-
॥ चतुर्पता गाय जागृत । अहीनाच्या ईथं । चातुरा घरी आली...
पाजे अमृताचा पान्हा । धन्य माउली ॥

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥

॥ मुळावरची ओवी ॥

॥ निरसनसह माया चैत्यन्या आदीमाया ॥

-: निरसन/स्पष्टिकरण :-

॥ माया चैत्यन्या, आदी माया । विनवितो इथं ।
हे होय, माया । माहया मायची, सांगतो किर्त ॥

खंड ०१/०२/ओवी०२:-निराकार निरंजन/चरण०३ च्या निरसनावरून आपणास ग्यान आलेले आहे की : प्रथम यवगी चतुर्पति धन्याच्या चतुर्पती ग्यानाव्दारे पृथ्वीवरचे विषम विषर्जित होवुन पृथ्वीवर सम समानतेची रंचना झाली होती. त्यावेळी या चतुर्पती च्या ग्यान-भक्तीच्या नादामुळे तिथे सर्वांना सत्रावी जिवनकळा ज्योतीची गोडी लागली होती. सर्व आकाशवाणीचा चौथा निराकार निराधार निरंजन आदीपुरूष भैस नारायण नामी भक्तीरत् होते. या गोडीमुळेच विषमतेचे विर्सजन झालेले होते. सर्वत्र समसमान रंचना होती. ही समसमान रंचना कशी महामाया व्दारे मोडल्या गेली ? याची आता सांगतो गा किर्त !

हे होय, माया । माहया मायची सांगतो किर्त :-

प्रथम यवगी च्या समसमानेच्या विश्वरंवनेला छेद देण्याकरीता चौथ्याने दिलेले देणं अंमलात आणण्याचा संकल्प आदीमायासह तिघांनी केला. तिरगुणी राजे व त्यांची महीमा सह सत्ता स्थापन करण्यासाठी आदीमाया सह त्रिदेवांनी चतुर्पती कडे प्रार्थना मांडली. धन्याव्दारे आवाजी दिलेले देणं ची अमंलबजावणी करीता तसेच धन्याव्दारे मुळयवगी मिळालेल्या त्या देणं चा शकुन साधण्याकरीता, चौथ्या चतुर्पती धन्याकडे सुमरन प्रार्थना निरंतर केली. प्रार्थनेच्या अधीक ग्यानासाठी शक्ती खंड०१/०२/ओवी०२/चरण०३ चे निरसन वाचा. मायाचैतन्येसह त्रिदेवांनी केलेल्या प्रार्थनेला तो आपरूप चौथा चतुर्पती धनी पावन झाला. आणी त्या आकाशवाणी करणारा आपरूप चतुर्पती धन्यानं स्वतः लहानपण घेत एक खेळ उभा केला. या खेळात त्याने चतुर्पता गाय उभी केली ती अशी :

धन्याच्या या एका खेळात त्या आदीरूप चतुर्पती धन्याने त्याच्या आकाशमात मधील सृष्टीतील चौ-वेदांच्या ग्यानासह सर्व सुक्ष्मःत्तर सुक्ष्मः असे ग्यान एकत्र केलेत. या सर्वत्र ग्यानाचा एकच ग्यानपिंड बनवुन या ग्यानपिंडाला गाईचा आकार दिला. त्या गाईच्या आकारात आपले चैतन्यसह सर्व शक्तीयॉ सिध्दीयॉ ओतुन ती १८ वर्णाच्या सर्वग्यानसह चौ-वदाची गाय सजीव केली. अश्यारितीने या चतुर्पती धन्यानं १८ वर्णाची चौ-वेदाची गाय उभी करून, ती गाय २१ स्वर्गाच्या वर असलेल्या उर्ध्व स्वर्गावर पाठवुन दिली.

मायाचैतन्या आदीमाया ला ईथ विनवुन, माया देवतांने या चतुर्पता गाईचे ग्यान आपरूप चतुपती धनी अवतार भैसा कडुन कसे हस्तगत केले ? याचे ग्यान इथं देवुन या मायेची आता किर्त सांगतो.

सर्व ग्यानाचे एकत्रीकरण झालेला एकच ग्यानपिंड व्दारे उभी झालेली ही चतुर्पता गाय उर्ध्व स्वर्गावर राहत होती.

॥ स्वर्गा वरतं, होती गाय । तिचे होते चौघं ।
तिच्या अमृतानं देहें । जगवला पिंडं ॥
॥ अमृत पान्हा, पाजुन चौघां । अशी बोले गायं ।
माझा अंगी कार आता । कोण करन साहयं ॥
॥ भाग वचनं, पुर्विच देणं । राखावं ईमानं ।
भैस बोले, हद्यी मांसी । जागा देईनं ॥

उर्ध्व स्वर्गावर सर्व ग्यानपिंडा व्दारे उत्पन्न झालेली धन्याची १८ वर्णासह चौ-वेदाची चतुर्पता गाय होती. आणी तिथे त्या स्वर्गात ब्रम्हा विष्णु शंकर हे तिघे आणी खंड०१-०१-०१:-शक्तीच्या ओवी मध्ये कैलाशी निघुन गेलेला चौथा आदीपुरूष आदीमुनी भैस अवतार होता. असे चौघे जन त्या स्वर्गावर होते.

ज्याप्रमाणे कृष्णाजी आपल्या चतुर्पतीच्या सच्च्या भक्तजनांना चतुर्पता ग्यानाचा पान्हा पाजत आहे. त्यांचा पिंड जगवण्यासाठी त्या सच्च्या भक्तांच्या अडी-अडचनी, संकष्टे-आरीष्टे, रोग-विघ्ने दुर करत त्यांचा पिंड जगवत आहे, त्याप्रमाणे तिथे स्वर्गावरही या ब्रम्हा-विष्णु शंकर भैस या चौघांचा देहपिंडाला चतुर्पता गाय आपला सर्वग्यानसंपन्न अमृत पान्हा पाजत होती. त्यांचा पिंड जगवत होती. या चतुर्पती गायीनेच आपला अमृतपान्हा पाजुन या चौघाचा देह-पिंड जगवला. या चतुर्पता गायीने आपला अमृतपान्हा पाजुन या चौघांचा पिड जगवल्यानंतर ही चतुर्पता गाय त्या चौघाशी अशी बोले की : जे तुमचे पुर्विचे देणं होत, ते देणं चे शकुन सिध्द करण्याकरीता आदीरूप धन्याने मज उत्पन्न केले होते. मुळयवगी शक्तीसमोर जे आवाज उठले होते, ते शकुन आता साधल्या गेलेले आहे. आता ते शकुन सिध्द होवुन तुमचं देणं तुम्हास लाभलेले आहे. या चतुर्पता गायी व्दारे तुम्हास सर्व ग्यान येवुन, तुम्ही सर्व ग्यानसंपन्न झालेले आहात.

या सर्व ग्यान पिंडात चौथ्या चतुर्पतीच्या ग्यानपिंडाचा जो भाग आहे, तो चौथा भाग चतुर्पतीला कोण देणार ? या चतुर्पता गाईचा जो भाग आहे, तो भाग या चतुर्पता गाईला कोण देणार ? आता तुम्हा चौघा पैकी या चतुर्पता गायीचा कोण अंगीकार करणार ? कोण या चतुर्पता गायीला साहयं करणार ? कोण माझा भाग मला देणार ? कोण या चतुर्पताचा भाग ईमान राखुन ईमानदारीने देणार ? ज्याचा भाग त्याला दिल्यानेच, काहीतरी कनवा येईन त्या चतुर्पती धन्याला । म्हणुनच या चतुर्पतीच्या भाग राखण्याकरीता कोण मजला हे वचनं देणार ? भाग वचन पुर्विच देणं झाले आहे. आता तुम्ही ईमान राखावं. अशी गाय बोलली.

उत्तरादाखल चौथा भैस बोले की : या चतुर्पता गाईला माझे मिर्तलोकच्या हदयी असलेल्या मासा-मासाच्या पेंशी-पेशीत, रोमा-रोमात केसाच्या प्रतेक छिद्रात चतुर्पतीच्या प्रती भक्ती भाव व तुझेच नाम भिनवुन चतुर्पती चा रोमीद्युत बनवुन तुजला जागा देईन. चतुर्पती चा रोमी द्युत बनुन तुझा अंगीकार करेल. या चौथ्या चतुर्पती धन्याला त्याचा चौथा भाग ईमानदारीने अर्पण करेल. असे वचने देतो.

ऐसे वचने चौथ्या भैसाने चतुर्पता गायीला देवुन तिचा अंगीकार केला. एकलाच चतुर्पता गाई चा संग सदा करू लागला. परंतु त्या त्रिगुणी मायासह त्या तिघांनी वेगळाच आपला तिरगुणी खेळ मांडला. या तिरगुणी खेळांमुळे तिरगुर्णीने केलेल्या तिनगुणी चिखलात चतुर्पता गाय फसली.

॥ चिखला मध्ये, फसली गाय । निरोप चौघांशी ।
वरवर केलं, तिघानं । चिंता, पडली भैसाशी ॥

चिखला मध्ये, फसली गाय :-

आदीमायासह त्रिदेवांनी आपल्याल्या मिळालेल्या देणं च्या भरोवश्यावर अन्जान जनसामान्यावर आपले तिरगुणांचे ग्यानाचे फासे टाकलेत. त्यांना तिरगुणी ग्यानाच्या बंधनात अडकवु लागलेत. आपल्या तिन पुत्रांची तिरगुणी सत्ता स्थापनेच्या हेतुने मायेने आपल्या चतुर्पती धन्याचे चतुर्पती ग्यान सर्वसामान्य भक्तजनास न देता, चतुर्पती गाईच्या चतुर्पता ग्यानावर पडदा

टाकत ती माया तिरगुणी ग्यानांचा प्याला मधुपानाप्रमाणे जनलोकांस पाजु लागली. जसे जसे मायेसह तिनदेवांनी पाजलेले तिरगुणी ज्ञान वाढु लागले, तसे तसे त्यांची स्वतःचीच महीमा वाढवत ते सत्ता स्थापन करू लागले. सत्ता स्थापनेकरीता तिरगुणांचे राजे व त्यांचे तिरलोक्यातील तिरगुणी अवतार यानी स्वतःचेच स्तुतीगाण, महीमा पुजा अर्चना, व्रत-वैकल्प चे तिरगुणी ज्ञान अन्जान लोकांना देण्याचा सपाटा सुरू केला. सत्यदेव चतुर्पती धन्याला पडीत टाकुन ते ज्याच्या पासुन बनले त्यालाच बेंईमान होवु लागलेत. तिरगुणी मायेच्या तिरगुणांव्दारे चतुर्पतीचे ग्यानावर गडद पडदा टाकल्या जावु लागला. चतुर्पतीचे कुणी भजन पुंजन सुमरन करे ना ! मायेच्या या तिरगुणी ग्यानांव्दारे ती चतुर्पता गाय पडीत पाडल्या गेली. या सैरवैर वाढलेल्या पुजा-पाठ, व्रत-वैकल्प जप. ईत्यादी स्वतःचीच स्तुतिगान करणा-या तिरगुणी ग्यानाचा तिथे चिखल झाला. या तिरगुणी ग्यानांच्या चिखलात ही चतुर्पता गाय फसली । फसल्या गेली.

निरोप चौघाशी :-

चतुर्पता गाय ऐसी फसल्यामुळे त्या चतुर्पता गाईने चौघाशी निरोप धाडुन आपल्यापाशी बोलावले. आणी समजावुन सांगीतले की :

ज्याचा भाग त्याला दिलाच पाहीजे. या चतुर्पता गायीला बेईमान न होता आप-आपले ईमान राखावे. हे तुमच पुर्विच देणं असल्यामुळे या चतुर्पता गाईचा पान्हा पिवुन तुम्ही मोठे झालेत. आता चतुर्पती शी राखा हो ईमान ! भाग वचन पुर्विचे देणं राखाव ईमान !

वरवर केले तिघांनी :-

चतुर्पता गाईच्या उपदेशाने त्या तिघांनी आदीपुरूषाची निरंजन ज्योत लावुन आपले कर्मे कांड करायचे असे ठरवले. आदीपुरूष धन्याची निरंजन ज्योत लावुन आपले पुजापाठ कर्मकांड चालवण्याचा नेम घालुन वरवर चतुर्पतीची चिंता आहे असे दाखवले. परंतु सत्तेच्या अभिलाषापायी चतुर्पता गाईला पडीत टाकुन आपले तिरगुणी ग्यान वाढवण्याचे कार्यच ते तिन करत गेलेत. या चतुर्पता गाईचे बावन्नकशी सोन्याप्रमाणे असलेले ग्यान काही सर्वसामान्यांच्या हाती जावु दिले नाही. हे चतुर्पता ग्यान स्वतःजवळ झाकुन ठेवुन, आपलेच तिरगुणी ग्यान ते जनसामान्यांना मधुपानाप्रमाणे पाजु लागलेत. व आपली तिरगुणी सत्ता वाढवु लागलेत. तिरगुणांची सत्ता गाजवु लागलेत.

चिंता पडली भैसाशी :-

माये सह तिघांच्या अश्या वागण्यामुळे त्या चौथ्या भैसास चिंता पडली. आता चौथ्या एकल्यालाच ही गाय या तिरगुणांच्या चिखलातुन उपसावी लागेल. या चतुर्पता गायीला आपण तसे वचन दिले आहे. दिलेले वचन व ईमान राखावं लागण्याकरीता त्या चौथ्याने कम्बर/कटी बांधुन पडीत गायीला हात देवुन वेळोवेळा तिरगुणी चिखलातुन उपसत राहण्याचे कार्य करत गेला. चतुर्पती गाय चे चतुर्पता ज्ञान गंगेचे अमृत पाणी सच्च्या भक्तगणांना वाटण्याकरीता कंम्बर बांधुन सज्य होवुन कार्यरत् राहु लागला.

॥ आदी भैसानं बांधली कंम्बरं । उपसली गायं ।
गंगे तिरी नेवुन तिचे । धुतले पाय ॥
॥ गाय बोलली, भैसा परी । मी जातो पाहयं, मी राहते साहयं ।
त्याच वेळी त्या गाईनं । ठेवला पिंड ॥

कंबर बाधुन सज्ज्य होवुन चौथ्याने जेव्हा ही चतुर्पता गाय तिरगुणांच्या चिखलातुन उपसुन चतुर्पती ज्ञानगंगेत नेवुन तिचे पाय धुतले, तेव्हा ती

चतुर्पता गाय बोलली की : मी जाते आता पाहयं ! ही चतुर्पता गाय सदैव चौथ्या चतुर्पतीच्या भक्तगणांना नित साहयं राहीन. जो कोणी चौथ्याचे भजन पुंजन सुमरन शुध्द अंतकरणाने करेल, त्याला मी नित साहय होईन. त्याना माझा चतुर्पता पान्हा सदैव पाजत ठेवत त्याचा देहपिंड जगवेल. त्यांना तिरगुणांच्या पल्याड नेवुन तिरगुणांच्या पल्याड उभ्या असलेल्या धन्याकडे जाण्यासाठी सदैव त्याची पाठराखन करेल. असे कोणत्याही परिस्थीतीत नित साहयं करत राहण्याचे वचने गाईने दिलेत. तर भैसाने पुर्विचे भाग वचन गाईला दिले.

भाग वचन पुर्विच देणं ! राखतो गाईशी ईमान ! असे भैसाने दिलेल्या वचनाव्दारे ती गाय संतुष्ट व समाधानी झाली. प्रसन्न होवुन त्याच वेळी त्या गाईने आपला आंगचा सर्वग्यानयुक्त ग्यान-पिंड चौथ्या भैसा सम्मोर ठेवुन गुप्त झाली. निराकार अव्यक्त अवस्थेत गेली. विदेह झाली. गाय जेव्हा आपल्या मुळ निर्गुण निराकार स्वरूपात गेली, तेव्हा तिथचा तिच्या आंगचा सर्व ग्यान असलेला एकच ग्यान-पिंड मिर्तलोकच्या ताळी गंगेतिरी पडला. तिच्या आंगचा सर्वत्राचे ग्यान असलेला एकाच ज्ञान-पिंड सह ती निराकार विदेह स्वरूपात मिर्तलोकच्या ताळी आली.

॥ गाय गेली/मेली ताळी आली । ऐसा बोले भैसं ।
ब्रम्हा विष्णु, तिरनयनं । चला जावु तिथं ॥
॥ चौघं मिळुन, ताळी येवुन । उध्दारली/विधारली गायं ।
चार वाटण्या, चार भाग । सुदामत आहयं ॥

चतुर्पता गाय ही निराकार अव्यक्त अवस्थेत गेली आहे. आणी तिच्या आंगचा सर्व ग्यांनाचा ग्यान-पिंड मिर्त लोकच्या ताळी पडुन ती ताळी आली आहे. असे भैस त्या तिघांसमोर बोलला. भैस तिघांस म्हणे की : ब्रम्हा विष्णु शंकर हो ! चला जावु तिथे !. आणी मग तेथुन ते ब्रम्हा विष्णु शंकर भैस हे चौघे चतुर्पता गाईच्या मागोमाग मिर्तलोकच्या ताळी आलेत. चतुर्पता गाईचा उध्दार करण्यासाठी त्यानी चतुर्पता गाईच्या आंगच्या एकाच ग्यान-पिंडाचे पुंजन करून एकाच ग्यान-पिंडांचे सुर्वणाचा सुरा घेवुन चार भाग केलेत. एका पिंडास चार भागात विधारली म्हणजेच एकाचे चार भागात विभागणी केली. चतुर्पता गाईच्या एकाच ग्यानपिंडाचे हे चार भाग म्हणजे १. ऋग्वेद २. यजुर्वेद ३. सामवेद आणी ४. अथर्व वेद हे चार ग्यान-पिंड होय. ब्रम्हा विष्णु शंकर आणी चौथा भैस या चार जनांनी हे चार ग्यान-पिंड वाटुन घेतलेत.

॥ आपला भाग पहा गिळला । राया भैसानं ।
तिघां जनांन, गंगे मध्ये । केलं पिंड दानं ॥
॥ आदी रूप भैस राया । गंगे थडी होता ।
सोडलेले पिंड तेही । गिळले आता ॥
॥ भाग वचन पुर्विच देणं । राखलं ईमान, राखला मान ।
हद्या मध्ये, जागा देल्ली । आदी भैसानं ॥

गाईच्या ज्ञानपिंडाचे जे चार भाग चौघाने समसमान वाटुन घेतले होते, त्या चार भागापैकी आपला जो चौथा भाग होता, तो राया भैसानं आपल्या पोटी गिळला. परंतु ब्रम्हा विष्णु शंकर या तिघा जनांनी त्यांच्या जवळ असलेले तिन ग्यान-पिंड उमजुन न आल्यामुळे त्यांच्या वाटणीस आलेल्या गाईच्या त्यां तिन ग्यान-पिंडाचे त्या तिघांनी गंगेतिरी पिंडदान केले. जेव्हा ते तिन ग्यान-पिंड गंगेत वाहु लागले, तेव्हा तिथे गंगेतिरी उपस्थीत असलेला चौथा भैस यांने ते तिनही ग्यान-पिंड उचलुन घेतले. आणी गंगेत सोडलेले तिन वेदाचे तिन ग्यान-पिंड आपल्या पोटी गिळले. अश्या रितीने भैसाच्या पोटी चारही ग्यान-पिंड आलेत. पोटी असलेल्या चौथा अथर्वन् वेदाचा ग्यान-पिंड सह

तिन ग्यान-पिंड असे गाईच्या चारही ग्यान-पिंडाला हद्याच्या रोमारोमात भिनवुन हद्यामध्ये भैसानं गाईला जागा दिली. संपुर्ण ग्यान-पिड स्वरूपी गाईला आपल्या हदयाशी कवटाले.

चौथ्या चरणात *भैस बोले, हद्यी मांसी । जागा देईनं* असे जे वचन भैसाने गाईला दिले होते, त्या वचनाची ईमान राखले. गाईच्या चारही पिंडाला आपल्या हद्यामध्ये जागा देवुन, गाय च्या ग्यानपिंड स्वरूपाचा मान राखला. सर्व चारही पिंड सच्च्या दिलाने भक्तीभावाने पठन व आत्मसाद केलेत. सपुर्णतः आत्मसाद करून त्या चारही ग्यानपिंडा च्या ग्यानाला रोमारोमात जागा दिली. हद्याच्या मासा मासात पेशि-पेशीच्या रोमारोमात चतुर्पता गाई प्रती भक्ती भाव भरवला. भक्ती-भावाने त्या गाईचे चतुर्पता नाम सर्वांगी रोमा रोमात भिनवुन रोमीद्युत बनला. चतुर्पता गाईचा रोमीद्युत बनुन त्या निराकार गाईचा सर्व वाणरूपी पिंडाचा अंगीकार हदयी मासी जागा देवुन केला. अश्या रितीने या आदीभैसाने *भाग वचनं, पुर्विच देणं । राखलें ईमानं ।* हदयी मासी चतुर्पता गाय धरली हो या आदीभैसानं ! आणी तिघे पिंडदान करून तसेच रिकाम्या पोटी रिकाम्या हाताने आपल्या मायेकडे गेलेत. तेव्हा मायेने त्या तिघांना विचारले की : काय घडले त्यांच्या सर्व खुणा सांगा मजला आता ?

॥ तिघां जनां, पुसे खुणां । माया देवतां ।
गाई पोटी, सर्वच होतं । गमावलं आतां ॥
॥ होवुन मावची, कलारीन । इनं, बसवली पेठं ।
गळा हात, घालुन भैसाला । आणावं/आणले इथं ॥
॥ पाजुनं महा कारण कार । कळपी केला धुंदं ।
उलाट होवुन, या भैसाला । अवघी होती/आहे शुध्दं ॥

तिन पिंडाचे गंगेत पिंडदान करून जेव्हा ब्रम्हा विष्णु शंकर हे तिघे रिकाम्या पोटी रिकाम्या हाताने माया देवते कडे गेलेत, तेव्हा मायादेवतां त्यांना म्हणाली की : काय घडले त्याच्या खुणा सांगा मजला आता ? गाई पोटचे वाण रूप तुम्ही आता मज दाखवा हो. तेव्हा त्यां तिघांनी घडलेली सर्व हकीकत माया देवतेस कथन केली.

तिघांच्या मुखातुन सर्व घडलेली घटना ऐकुन माया त्या तिघांना उद्देशुन बोलली की : जे तुम्ही तिन पिंड गंगेत पिंडदान करून गंगेला अर्पण केलेत, ते तिन पिंडच तर गाई पोटचे वाणं असलेले तिन वेद होय.

गाई पोटी, सर्वच होतं । गमावलं आतां :-

चतुर्पता गाईच्या पोटी चौवेद ग्यान सह सर्वच ग्यान होत. सर्वच वाणं रूपी देणं त्या गाईच्या पोटी होत. आणी तिच्या आंगचे हे सर्वत्राचे सर्व ग्यान चे वाणं तिच्या चारही ग्यान-पिंडात आलेले होते. परंतु तुमच्या अज्ञानीपणा मुळे ते चारही ग्यान-पिंडाचे ग्यान एकल्या भैसाच्या पोटी गेलेले आहेत. भैसा पोटी गाईचे सर्वच वाणंरूपी देणं गेलेले आहे. तुम्ही तिघांने तुमच्या वाटयास आलेले ते सर्वच ग्यानाचे वाणं रूपी देणं तुम्ही गमावले आहे.

होवुन मावची, कलारीन । इनं, बसवली पेठं :-

मायादेवताने एवढ सर्व त्या तिघांना कथन करून त्या तिघांची घडलेली चुक तिघांना दर्शविली. तिघांचा भाग तिघांना मिळवुन देण्यासाठी या तिरगुणी मायेच्या मनात तिरगुणां सह तिरगुणांच्या तिन देवांचा पसारा पसरवुन त्याचा विस्तार करण्यासाठी कल्पना आल्यात. माव-लिला ची कलारीन होवुन तिरगुणांचा बाजार मांडण्याकरीता ज्या कल्पना मायादेवतेच्या मनी आल्या, त्या कल्पनेचा रंग धरून ती मायादेवता महामाया रूपात प्रकटली. म्हणुनच कल्पना

म्हणजे माया ! असे जाणत्यांव्दारे म्हटल्या जाते. ईच्छा शक्ती झाली, तर कल्पना माया झाली ! व तिने सात प्रकारचे रूपे घेत घेत सप्तमाया झाल्यात. सप्तमायाचे ग्यान खंड ०३/०१ मुळस्तंभीचा पाया या ओवीतुन घ्यावी.

चौथ्याच्या पोटात असलेली वेंदांसह सपुर्ण ग्यानसंप्पत्ती प्राप्त करण्यासाठी माया ने ज्या कल्पना कल्पील्या होत्या, त्या कल्पना साकार करण्याकरीता तीने अनेक माव लिला खैळ मांडत मावची कलारीन बनुन महामाया चे रूप घेतले. आपल्या मोठया मोठया पेठा स्थापल्यात. आपला तिरगुणी बाजार मांडला. आणी ती कलारीन बनुन या बाजारात बसली. आपले मायावी तिरगुणी ग्यान ती मधुपानाप्रमाणे जनास पाजु लागली. ही कलारीन महामाया तिच्या तिरगुणी मायाज्ञानाच्या पेठेत येणा-या जनलोकांस मायायुक्त तिरगुणी ज्ञानाचे प्यालावर प्याले पाजुन त्यांना धुंद करू लागली. तिरगुणी मायाज्ञानाची नशा वर नशा चढवुन त्यांची मुळ शुध्द हरवु लागली. त्या जनांस त्याच्या शुध्द स्वरूपाचा विसर पाडुन आपल्या मागे लावु लागली. आपल्या मागे नाचावयाला भाग पाडु लागली.

तिन देवांना वेदज्ञानरूपी संप्पती कशी गमावली ? याच्या खुणा मायेने तिघांना विचारल्या नंतर या तिन देवांचे तिरगुणी राज्य वाठवण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेली ज्ञानसंप्पत्ती कशी प्राप्त करावयाची ? याकरीता मायेने मनी कपट कल्पलेत. चौथ्या च्या पोटी असलेली वेदसंप्पती प्राप्त करण्यासाठी मनी कपट कल्पना करणारी होय ही कपटी माया देवता ।

॥ ही माया मोठी कपटी । लागली मोठया-मोठयाच्या पाठी ।
ईने घातली मच्छींदराला मिठी । ईने मथवले जगजेठी.... ॥
॥ या मायेला जपुन चाला । ईच्यामुळे रामराया गलपटला ।
पाहता पाहता धोका दिला.....॥ खंड-०८/०१/ओवी-०५
॥ ईची सत्ता तिनही ताळात । महा महा केले ईने लंपट... ।
ईद्र-चंद्र गणी-गंधर्व सह, तिनदेव या मायेच्या आज्ञेत ॥
॥ ईने गाजवली सत्ता । ईन वाठवली अहंता ।
भुल पाडली ईन सर्वत्रा । भलताच गवसवते ही रस्ता ॥
॥ भक्तजन भुलले सोसा । म्हणुन जन भंगले आचार-विचारा ।
नाही तत्वाची सुध-वुध । ईने मागे लावला चौ-यांशीचा फेरा ॥
.....ऐस अवघ टाकलं मोहुन । पहा मायेन या मायेन ॥

मृगजळाप्रमाणे दिसणारी ऐशी ही माया तिरगुणांचा पसारा घेवुनी व्यापली आहे. म्हणुनी तिरगुण करे धिंगाणे । पंरतु तुम्ही शुध्द सत्वात राहुन, दया क्षमा शांती प्रसन्नता धरून, आशा मनशा ईच्छा पापी कल्पना जाळुन, शुध्द सत्वी चौथ्याचे मनी ध्यान ध्यास धरावे.

ही कपटी माया जन्मतः या देहीला जोडल्या गेली आहे. म्हणुनच ही देही मनी ईच्छा आशा मनशा कल्पना रंगवत कपट कल्पुन धोका देवुन काही ना काहीतरी मिळवण्यासाठी प्रयत्न करत राहतो. या मायेच्या अध्यानी ही अमृत वाणी घेत नाही कोणी । मायाशक्तीत पडत राहते देही नेहमी ।.

तिरलोक्यातील तिरगुणी अवतार यांच्याव्दारे तिघांचे राज्य वाठवण्यासाठी आपली मोहनमाळा तिन देवा सह त्यां तिरगुणी अवतारांच्या गळात घालुन, हे सर्व या मायेने आपल्या अध्यानी केले आहे. या मायेच्या अध्यानी राहुन तिनदेव व त्यांचे तिरलोक्यातील अवतार देवांगण यांचा विस्तार पावला आहे. या मायेमुळेच जीव मायेच्या अधीन होवुन भोग कल्पीतो.

परंतु *'कल्पना म्हणजे माया'* आणी *'ईच्छा म्हणजे शक्ती'* यांना त्या परंब्रम्ह निराकार निरंजनाचा स्पर्श नाही. म्हणुनच आता विनवा विनवा हो त्या निश्कलंकी निरंजन धनी परमात्म्याला की :

॥ तिरभवन घडलं तुम्हा हात । मोडा माया-शक्ति मारा लाथ ।
कर लवंडी-बवंडी दासी । घाल घरात, सुखी नांदव नरदेहीस ॥०१-०२-०५

धनी देवा ! पिंडी या ब्रम्हांडी चे तिरभवन तुम्हा हात घडल आहे. या तिरभवनात माया-शक्ती आपला धिंगाणा घालत आहे. तिचा त्रास तुमच्या भक्तजनांना होत आहे. म्हणुनच या माया-शक्ती चा नाच व्दारे झालेला धिंगाणा मोडा. त्याकरीता ईला लाथ मारा ! आणी या माया-शक्तीला सच्च्या भक्तजनांच्या देहीच्या बांडीची दासी म्हणजेच बनियनच्या आतल्या खिश्यात मावणारी लटकत लंगडत लंगडी चालणारी लवंडी-बवंडी माझी दासी करून घरात घाल. सुखी नांदव या नरदेहीस ! ०१-०२-०५. माझे अंतर तुमच्या ग्यान भक्तीच्या रंगात रंगवुन या कल्पना म्हणजेच माया च्या पालव्या तोडुन देहीत नांदा. ॥ देवा माझे अंतर रंगवा । यवगा यवगी संग वागवा ।
कल्पनेच्या तोडुन पालव्या देहीत नांद माहया ॥

गळा हात, घालुन भैसाला । आणावं/आणले इथं :-

अश्या रितीने माया ने महामाया देवतेचे रूप घेवुन त्यां तिघांना म्हणाली की : मी आता कवली पेठ/मोठी बाजारपेठ वसवुन मावची/लीलांची कलारीन होवुन महामाया चे रूप घेवुन बसली आहे. आता तुम्ही तिघे कसेही करून आणाभाका टाकुन, गळा हात घालुन चौथ्या भैसाला या महामायेच्या पेठेत घेवुन या !

तिघांना महामायादेवतेने सांगी केल्यानंतर ते तिघे भैसाकडे गेलेत. भैसाची मनधरणी करून गळा हात घालुन त्या भैसाला महामायेने वसवलेल्या पेठेत आणले.

पाजुनं कारण-महाकारण कार । कळपी केला धुंदं :-

मायादेवतेने मावची कलारीन होवुन रंचलेल्या पेठेत तिघांनी गळा हात घालुन भैसाला आणल्यानंतर त्या भैसाच्या पोटचे ग्यान काढण्यासाठी भैसास कारण महाकारण चे ग्यान मायादेवतेसह ते तिघे मधुपाना प्रमाणे पाजु लागलेत. ऐसे केल्याने तैसे होते. तैसे केल्याने हे असे होते. तैसे करण्याचे कारण हे आहे. त्या कारणासाठी हे कार्य करावे लागते. या कार्य-कारणाने ते कारण होते. त्या कारणाने हे महाकारण होते. ते कार्य-कारण आहे तुम्हा हाती. ते सर्व जगाच्या ग्यानाचे महाकारण होवु शकते. असे त्यां भैसाला कारण महाकारण सांगत सांगत त्या भैसाला कारण महाकारण च्या कार्य कारण-महाकारणं च्या कळपात धुंद केलेत. भैसाची देहमती उलाट केली.

उलाट होवुन, या भैसाला । अवघी होती/आहे शुध्दं :-

परंतु तिरगुणींनी एवढ सर्व उलट सुलट ग्यान सांगुनही त्या भैसाला अवघी सुद शुध्द होती. भैसाला सर्व काही कळत होते. माया सह हे तिघे कश्या करीता मज धुंद करत आहे ? याची सर्व जाण त्या भैसाला होती.

या महामायेच्या पेठेतच तिघांनी जेव्हा चौथ्याला आणले, तेव्हा तो चौथा भैसानं या पेठेत येताच 'जैसा देश वैसा वेष' घेतला खरा ! परंतु त्याला आपल्या स्वरूपाची शुध्द होती. म्हणुनच त्या पेठेत त्याच्या समोर मांडण्यात आलेल्या कारण-महाकारण ग्यान ची नशा उलटवुन पुर्णतः शुध्दित तो राहला.

'ज्याचा भाग देईन त्याला' या आपल्या मुळच्या वचना प्रमाणे कनवाळाने त्यांचे तिन भाग त्यांना देण्यासाठी तत्पर झाला.

॥ वेदा पाठी, वेद पढलें । सुने वेद तीनं ।
अथर्वन वेद, पोटी राहीला । पुढे यवगा कारणं ॥

पुर्णतः शुध्दित राहुन त्या चौथ्या भैसांने आपल्या मुळच्या वचनाप्रमाणे वागुन आपल्या पोटी जे तिघांचे तिन भाग होते, ते तिन भाग तिघांना देण्याकरीता त्यांच्या समोर तिन वेद पढले/वाचले. आणी ज्या वेदानं तो चौथा धनीदेव जागी होतो, तो आपला भाग असलेला चौथा अथर्वन् वेद हा पुढील येणा-या यवगाकारण आपल्या पोटीच ठेवला. अमृत संजीवनी असलेला तो चौथा भाग असलेला चतुर्पता अथर्वन् वेद काही तिघांच्या हाती दिला नाही. तिनदेवाने भैसामुखचे फक्त तिनवेद चे ग्यान-भोजन ग्रहन केलेत. तिन वेद प्राप्त झाल्याच्या आंनदाने मनात खुशाल झाले. परंतु ज्या चौथ्या वेदाने तो चौथा चतुर्पती धनीदेव जागा होतो, तो अमृत संजिवनी असलेला चौथा वेद चौथ्या पाशी आहे. असो..

अश्या प्रकारे ग्यान संप्पत्ती प्राप्त करुन घेण्याकरीता, आपले स्वार्थ साधण्याकरीता....ईत्यादी काही ना काही घेवुन येण्या-जाण्याकरीता माया ही अनेक माव/लीला खेळ रंचत महामायाचे रुप घेते. आणी आमच्या हातच-पोटचं झुठं घेवुन जाते. ऐशी ही झुठी माया..

॥ झुठीं माया, झुठी काया । झुठे देव तिन ।
भैसा मुखचं झुठं घेतलं । झाले वेईमान ॥ ०६/०२
॥ उष्टेच उष्टे अवघेच उष्टे । कौतुक पहा या देवाचे ॥ ०६/१३
॥ जो नाही होणार वेईमान । त्याला हा चौथादेव नामी सांभाळन ।
जो होईन वेईमान । त्याची, तो चौथा पुस घेईन ॥ ०२/३७
॥ फितुर बम्हया । अवघे शरण । म्हणे तिर्थ तुया पायी ।
पाय धुवुन जग पितीन । तरी त्यात अमृत नाही ॥ ०६/०२
॥ चतुर्पता वेदांत गाय । हे माझ तिर्थ ।
ईची अमृत संजीवनी आहे । या चौथ्याच्या पोटात ॥

ही महामाया या देहीला जन्मतः जोडल्या गेली आहे. म्हणुनच ही देही कोणत्याही प्रकारची संप्पत्ती उदा. धनसंप्पत्ती ज्ञानसंप्पत्ती....ईत्यादी प्राप्त करण्यासाठी घेण्या-देण्यासाठी अनेक लहान-मोठया खेळांचा बाजार रंचत-मांडत-मोडत धडपडत राहते. अंती ही महामाया संग जीव घेवुन हातच-पोटचं झुंठ घेवुन जाते. ऐसे धडपड करत भैसा मुखचे झुटं/उष्टे तिन वेद तिघांने घेवुन मनात खुशाल झाल आहेत.

॥ वेद घेवुन तीन देवं । खुशालं मनाशी ।
ज्या वेदानं, व्हावं जागी तो, नाही तिघा पाशी ।
चौथावेद/अमृत संजीवनी आहे । भैसा पोटाशी ॥

ज्याचा भाग त्याला दिल्यावरच काहीतरी कनवा धन्याला येतो. या कारणास्तव त्या भैसाने पुर्ण शुध्द सुद ठेवुन तिन वेद त्यां तिघांच्या समोर पढलेत/वाचन केले. आणी चौथा चतुर्पता अथर्वन् वेद पुढे येणा-या यवगाकारण आपल्या पोटीच ठेवला.

भैसाच्या मुखचे तिन वेद तिघांने मनलावुन भक्तीभावाने श्रवण करुन पुर्णतः आत्मसाद केल्यानंतर ते तिन वेद त्या तिघांच्या पोटी आले. तिन वेद तिंघांजवळ आल्यानंतर ते तिघे आपल्या मनाशी खुशाल आनंदी झालेत.

तिनवेद हाती आल्याची खुशी होवुन त्या आनंदाच्या भरात ते तिन हे विसरुन गेलेत की : ज्या वेदानं तो धनी जागी होतो, तो चौथा चतुर्पता अथर्वन् वेद त्या तिघांपाशी नसुन तो चौथा वेद तर पुढेच यवगाकारण भैसानं आपल्यापुढं नं पढता/वाचता आपल्याच पोटी ठेवला आहे. ही चौथी अमृत संजीवनी तर भैसा पोटी पुढेच यवगा कारण आहे.

मायादेवते सह तिघांन तिन वेद हे कपटी कल्पनेची माव-लिला रंचुन नित्कृष्ट दर्जा च मायेचा बाजार मांडुन कपटाने घेतलेत. म्हणुनच *'जैसे कर्म तैसे फळ'* या न्यायाने त्यां माया सह तिघांचा हीशोब कजब्या मध्ये त्यांना हीन नित्कृष्ट दर्जाचे स्थान देवुन केला आहे.

॥ कजब्या मध्ये, हिशोब केलां । याहीला केले हिनं ।
स्वर्ग-पाताळ, पेठा नांदते । अमृता गुणं ॥

कजबा/देही मध्ये या तिघाचा हिशोब भैसानं केला तो असा : ब्रम्हाला पाताळी बेंबीखाली स्वाधीष्ठान चक्रावर जागा दिली. तर विष्णुला बेंबीस्थानी रविचक्रावर जागा दिली. आणी शंकराला हद्यावर अनाहत् चक्रावर जागा देवुन या तिघांच्या वर कंठस्थानी आपण चौथा जीवदेवता बनुन वसला आहे.

आणी उर्ध्व स्वर्गि त्रिकुटी तिन जागा या तिघांना देवुन, या त्रिकुटा वर चौथ्या ताळी तो धनी वसला आहे. अश्या रितीने पिंडीत हा चौथा जिवदेवता आत्माराम धनी बनुन सर्वांना नांदवत सर्वांना आपल्या अख्त्यारी घेत आहे. या तिघांचे स्थान या कजब्यामध्ये त्या चौथ्या पेक्षा नित्कृष्ट हिन दर्जाचे आहे. म्हणुनच तिन देवांच्या तिन गुणांना पायदळी तुडवल्याशिवाय चौथा शुध्द सत्व प्राप्त होत नाही आहे. आणी चौथ्या शुध्द सत्व अवस्थेत गेल्याशिवाय तिरगुणांच्या पलीकडे उभा असलेला धनी काही प्राप्त होत नाही आहे. कजब्या मध्ये कसे हे तिघे हिन आहेत ? याबद्यलचे अधिक ग्यान कायाग्यान खंड०३/०१च्या मुळस्तंभिचा पाया व देहवर्णणाची ओवी ०३/०२ यातुन घ्यावे

॥ स्वर्गीं अमृत पाताळी अमृत, नाम नाही धन्या ।
नाम नाही रे धन्या । दोन्ही, पेठां पडल्या सुन्या ॥
॥ स्वर्गीं अमृत पाताळी अमृत, मिर्त लोकी नाम ।
तुमच्या नामा वाचुन अवघ, दिसते हिनं ॥

पिंडी या ब्रम्हांडी च्या स्वर्गि अमृत आहे. पाताळी अमृत आहे. परंतु या दोनही ताळ्च्या लोकांच्या हाती धन्याचे चतुर्पता नाम नाही. धन्याचे नाम तर मिर्तलोकी आहे. या स्वर्ग-पाताळ दोनही ताळात धन्याचे नाम नसल्यामुळे, ते एकमेकांची स्तुती करण्यातच धन्य मानु लागले आहेत. या दोनही ताळी धन्याचे नाम नसल्यामुळे या दोनही पेठा सुन्या आहे. धन्याच्या नामाविना या दोनही पेठा हिन आहे. त्याच मुळे यवगानं यवगा भ्रांत पडुन अवघ हिन झालेले आहे.

॥ यवगा परी, भ्रांत सारी । आज होतो नेणंता ।
वजाबाकी, भरुन झाली, यवगाची कथा ॥

-: शब्दार्थ :-

नेनंता= *एखादे काम करण्याचे कोरडे ज्ञान आहे परंतु अनुभव नाही, असे काम स्वेच्छेने केले आणी त्यात काही चुका झाल्या तर त्या चुकांना अनुभवीजन त्याला 'नेनंता' आहे असे समजुन माफ करतातं.*

उदाहरणार्थ *:- एखादा लहान बाळ काम आपले वडील काम कसे करतात हे बघत बघत तोही ते काम करण्यास उत्सुक होवुन त्या कामाचा प्रत्यक्ष्य अनुभव नसतांनाही ते काम हाती घेवुन करु लागतो. आणी या कामात काही चुका झाल्यास वडील त्याच्यावर न रागवता तो नेणंता आहे असे समजुन ते काम त्याला व्यवस्थीत*

समजवुन सांगत त्या कामात निष्णांत करतो. । **नेनंती** *:- असे अनेक कोरडे ज्ञानी जे आपल्या या ज्ञानाच्या भरवश्यावर अनुभव घेण्यास उत्सुक आहे । धडपडत आहे.*

या तिरगुणी माया महामायेने वसलेल्या तिन पंठे व्दारेच यवगान यवगापरी भ्रांत पडली आहे. या पेठेत नेणंता होवुन आदीपुरूष भैसाचा पुर्णअवतार कृष्णा त्याच्या पोटच्या **चतुर्पता अथर्वन् वेद** व्दारे चतुर्पतीचे काम पुढेचं येणा-या यवगाकारण यवगान यवगात करत करत आला आहे. आणी या कलीच्या संधीत तेरव्या सिध्दित उभा राहुन या समर्थाने तिरगुणींचा हिशोब घेण्याची तयारी सुरू केलेली आहे.

॥ अन्न-पाण्याचे, आहार त्याहीचे । जातीनं सकस ।
साहंकारी पोहन अधारी । तो नादंन इथं ॥
॥ चतुर्पता गिण्यानं देवाचं । चालन परंमाणं/प्रमाणं चालनं ।
मिर्त लोकी, तिर गुणांचं । उडवणं ठिकाणं ॥ प्रमाणं :- गाही, साक्ष
॥ चतुर्पता, अथर्वन वेद । उभा राहीन पोटी ।
निजरूप भुम्मा, जागी करनं । सारी शिरष्टी/सृष्टी ॥

आता या कृष्णाच्या यवगाच्या कामाव्दारे कलयवगात नित सत्यवग आणत पुढे सत्यवग होणार आहे. या तिरगुणी मायेच्या हिशोबाची वजाबाकी भरून झाल्यावर, या तिरगुणांच्या तिन यवगाची कथा संपुण चौथ्या चतुर्पती चे सतयवग् येणार आहे. कृष्णामुखच्या भैसाच्या पोटच्या चतुर्पता अथर्वन् वेदाच्या सांगी प्रमाणे सर्व काही होणार आहे. ज्यांनी अन्न पाणी चे आहार ओपार पुंजनमान दर्शन घेवुन देहा नाशवल्या आहेत, मुळ यवगं नाशवले आहेत. त्यांचा यवगापरीचा हिशोब भरून घेत, या तिरगुणी नाशीवंतांचे दर्शन मानसन्मान सह घेत असलेले त्याहीचे सर्व अन्न पाण्याचे आहार ओपार दर्शनमान पुंजनमान हे सर्वच/सकस उडुन जातीन. ऐसे या मिर्तलोकचे तिरगुणांचे सर्व ठाव-ठिकाणे ठाणे तो उडवुण टाकणार आहे. चतुर्पता अथर्वन् वेद सर्वजनास प्राप्त करून देणार आहे. हा चतुर्पता अथर्वन् वेद पुढे सर्वाच्या पोटा उभा राहुन, या चतुर्पतीचे गिण्यानं प्रमाणं/गाही देत या देहीची निजरूपी भुम्मा जागृत करत करत सारी सृष्टी जागृत करणार आहे. ऐसी या कृष्णरायाची सांगी आहे.

भजने :-

॥ माया चैतन्या माय तिघांची । गुणावंती/रूपावंती चतुर्पता गाय माझी ॥
॥ हे होय गाय गाय । गाय सर्वत्राची माय । चातुरा भला भेद पाहयं ॥
॥ हे होय गाय गाय । गाय चौवेदाची माय । चातुरा भला भेद पाहयं ॥
॥ हे होय गाय गाय । गाय माझी माय । चातुरा ईला तु पाहयं ॥
॥ हे होय गाय गाय । गाय तिरभवनी राहयं । चातुरा ईला तु पाहयं ॥
॥ हे होय गाय गाय । गाय सर्वत्र राहयें । चातुरा भला शोध तु पाहयं ॥

गजर :- ॥ चतुर्पता गाय जागृत, अहीनाच्या ईथ । चातुरा घरी आली...
पाजे अमृताचा पान्हा । धन्य माउली ॥

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥